## संक्षिप्त

### निफाडमध्ये उद्यापासून गोल्फ प्रशिक्षण शिबीर

**नाशिक :** निफाड येथील रिव्हर साईड गोल्फ कोर्सवर १३ आणि १४ सप्टेंबर रोजी सकाळी ११ ते १.३० आणि तीन ते सहा या वेळेत गोल्फ प्रशिक्षण शिबीर आयोजित करण्यात आले आहे. राष्ट्रीय खेळाडू तथा मार्गदर्शक इंद्रजीत भलोटिया हे मार्गदर्शन करणार आहेत. अधिकाधिक नाशिककरांनी या प्रशिक्षण शिबिराचा लाभ घ्यावा, असे आवाहन रिव्हर साईड गोल्फ कोर्सच्या वतीने प्रदीप बागमार, राजीव देशपांडे यांनी केले आहे. इच्छुकांनी ९४२२७०४६१४ या क्रमांकावर संपर्क साधावा.

### अहिल्यादेवी विद्यालयात उद्या हिंदी देवनागरी दिन

**नाशिक :** येवला पंचायत समितीचा शिक्षण विभाग आणि अखिल भारतीय हिंदी अध्यापक सभेच्या वतीने येवला तालुक्यातील सर्व माध्यमिक शाळांमधील हिंदी विषय शिक्षकांतर्फे राष्ट्रभाषा हिंदी तथा राष्ट्रलिपी देवनागरी दिन अंकाईतील पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर माध्यमिक विद्यालयात साजरा होणार आहे. येवला मुख्याध्यापक संघाचे तालुका अध्यक्ष व मुख्याध्यापक दीपक गायकवाड यांनी यासंदर्भातील माहिती दिली. हा कार्यक्रम सकाळी ११ वाजता होणार आहे.

# महिलांच्या खात्यातून पैसे कपातीवर कारवाई

**लोकसत्ता विशेष प्रतिनिधी**

**नाशिक :** लाडकी बहीण योजनेंतर्गत लाभार्थी महिलांच्या खात्यातून पैसे कपात करणाऱ्या बँकांवर कायदेशीर कारवाई करण्याचा निर्णय मंत्रिमंडळाने घेतला असल्याची माहिती राज्याचे अन्न, नागरी पुरवठामंत्री छगन भुजबळ यांनी दिली. लाडकी बहीण योजनेची माहिती व लाभ जास्तीत जास्त महिलांपर्यंत पोहचविण्यात अंगणवाडी सेविका आणि मदतनीस यांचे काम आदर्शवत असल्याचे कौतुकही त्यांनी केले.

येवल्यातील माऊली लॉन्स येथे आयोजित मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण-अंगणवाडी सेविका मदतनीस सत्कार सोहळ्यात भुजबळ यांनी मार्गदर्शन केले. यावेळी ११ अंगणवाडी सेविका, मदतनीस यांचा प्रातिनिधीक स्वरूपात भुजबळ यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. भुजबळ यांनी राज्यातील महिलांना सक्षम व कार्यक्षम करण्यासाठी शासनाने लाडकी बहीण योजना सुरू केल्याचे नमूद केले.

लाडकी बहीण योजनेचे अर्ज करण्याचे अधिकार यापुढे केवळ अंगणवाडी सेविकांना देण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. या कामात प्रत्येक लाभार्थी महिलेचा अर्ज भरण्यासाठी रुपये ५० मानधन देण्यात येत आहे.

येवला तालुक्यातील एक लाख आठ हजार ६३ महिलांना लाडकी बहीण योजनेचा लाभ देण्यात आला असून या योजनेच्या अंमलबजावणीचे श्रेय अंगणवाडी सेविकांना जाते. गोरगरीबांची सेवा करण्याची संधी शासनाने अंगणवाडी कर्मचाऱ्यांना दिली आहे. या संधीचे सोने करावे, असे आवाहन त्यांनी केले.




येवला येथे मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेतंर्गत अंगणवाडी सेविका, मदतनीस यांचा सत्कार करताना मंत्री छगन भुजबळ.

### अग्निशमन दुचाकीचे लोकार्पण

येवला येथे मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण-अंगणवाडी सेविका मदतनीस सत्कार सोहळ्यात ११ अंगणवाडी सेविका, मदतनीस यांचा प्रातिनिधीक स्वरूपात मंत्री छगन भुजबळ यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. याशिवाय, नगरपालिकेच्या अग्निशमन विभागात नव्याने दाखल झालेल्या दोन अग्निशमन दुचाकीचे लोकार्पण भुजबळ यांच्या हस्ते करण्यात आले. या दुचाकीच्या माध्यमातून येवला शहरातील अडचणीच्या भागात आगीवर नियंत्रण मिळविणे शक्य होणार आहे.

## पर्यटन दिनानिमित्त परिसंवाद, निबंध, चित्रकला स्पर्धा

**नाशिक :** जागतिक पर्यटन दिनाचे औचित्य साधून पर्यटन विकास महामंडळाच्या नाशिक कार्यालयाच्यावतीने परिसंवाद, निबंध व चित्रकला स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे.

या स्पर्धा महविद्यालयांनी आपापल्या महाविद्यालयीन स्तरावर घेणे अपेक्षित आहे. नंतर स्पर्धक विद्यार्थांचे निबंध व चित्र २० सप्टेंबरपर्यंत महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ, पर्यटन भवन, गडकरी चौक, प्रादेशिक कार्यालयात जमा करावेत, असे आवाहन प्रादेशिक व्यवस्थापक जगदीश चव्हाण यांनी केले आहे.

निबंध स्पर्धेसाठी पर्यटन - शांतता स्थापित करण्याचे एक साधन, पर्यटन व जागतिक शांतता, महाराष्ट्राची पर्यटन स्थळे व त्यांचा शांतता संदेश, माझ्या स्वप्नातील पयर्टन आणि भारत पर्यटन हे विषय आहेत. तर चित्रकला स्पर्धेसाठी पर्यटन दिनाच्या निमित्ताने पर्यटन व शांतता या घोषवाक्याशी निगडित चित्रकला स्पर्धेचे विषय आहेत.

निबंध व चित्रकला स्पर्धेचे पारितोषिक व प्रमाणपत्र वितरण सोहळा २७ सप्टेंबर रोजी होणार आहे. यावेळी महामंडळाच्या पर्यटक निवासांच्या माहितीपत्रकाचे प्रकाशन केले जाणार आहे. याबाबत अधिक माहितीसाठी कार्यालयाच्या ०२५३-२९७००४९ या क्रमांकावर संपर्क साधावा.

## नाशिक गणेश दर्शन



पंचवटीतील अचानक मित्र मंडळ



दिंडोरी रोडवरील जय महाराष्ट्र माथाडी आणि जनरल कामगार सेना मुख्य मार्केट यार्ड



पेठरोडवरील क्रांतिवीर कला क्रीडा मित्र मंडळाचा दत्तनगरचा विघ्नहर्ता



पेठरोडवरील श्रीमान सत्यवादी मित्र मंडळ

(छायाचित्र: यतीश भानू)


TATA

**टाटा कॅपिटल हाऊसिंग फायनान्स लिमिटेड**

**नोंदणीकृत कार्यालय :** ११वा मजला, टॉवर 'ए', पेनिन्सुला बिझनेस पार्क, गणपतराव कदम मार्ग, लोअर परळ, मुंबई-४०० ०१३. **शाखा कार्यालय :** टाटा कॅपिटल हाऊसिंग फायनान्स लिमिटेड, ऑफिस नं. ४१, ४था मजला, बिझनेस बे, कुटे मार्ग, तिडके कॉलनी, मुंबई नाका, नाशिक-४२२ ००२, महाराष्ट्र.

**स्थावर मालमत्तेच्या विक्रीकरिता सूचना**

**(सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेन्ट) रुल्स २००२च्या रुल ९(१) यासह वाचलेल्या रुल ८(६) अंतर्गत)**

सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेन्ट) रुल्स २००२च्या रुल ८(६) व रुल ९(१) यासह वाचलेल्या सिक्युरिटायझेशन ॲण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल ॲसेट्स ॲण्ड एन्फोर्समेन्ट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ अंतर्गत स्थावर मालमत्तेच्या विक्रीकरिता ई-लिलाव सूचना

याद्वारा आम जनतेस आणि खालील विशेषकरून ऋणको/ सह-ऋणको किंवा विशेषकरून त्यांचे विधि वारसदार/ प्रतिनिधी (ऋणको) यांना याद्वारा सूचना देण्यात येते की, टाटा कॅपिटल हाऊसिंग फायनान्स लि.कडे (टीसीएचएफएल) गहाण असलेल्या याखाली वर्णिलेल्या स्थावर मालमत्तेचा ताबा टीसीएचएफएलच्या प्राधिकृत अधिकारींद्वारा घेण्यात आलेला आहे. सदर स्थावर मालमत्तेची विक्री याखाली नमूद केलेल्या ऋणको व सह-ऋणकोंकडील थकीत देणींच्या वसुलीकरिता ''जसे आहे जेथे आहे'' व ''जसे आहे जे काही आहे'' आणि ''जे काही आहे तेथे आहे'' या तत्त्वावर **२८.०९.२०२४** रोजी करण्यात येणार आहे. राखीव किंमत व इसारा रक्कम ठेव खाली नमूद केली आहे. याद्वारा सूचना देण्यात येते की, विक्रीची तारीख पुढे ढकलणे/ विक्री खंडित होणे न झाल्यास, उक्त सुरक्षित मत्ता/ मालमत्तेची विक्री उक्त **२८.०९.२०२४** रोजी दु. ०२.०० वा. ई-लिलावाद्वारा करण्यात येणार आहे. ई-लिलावात सहभागी होण्याकरिता इरठेची डिमाण्ड ड्राफ्ट समाविष्ट मोहोरबंद लिफाफा, शाखेचा पत्ता टाटा कॅपिटल हाऊसिंग फायनान्स लि., ऑफिस नं. ४१, ४था मजला, बिझनेस बे, कुटे मार्ग, तिडके कॉलनी, मुंबई नाका, नाशिक-४२२ ००२, महाराष्ट्र येथे **२७.०९.२०२४** रोजी सायं. ०५.०० वा.पर्यंत किंवा तत्पूर्वी टीसीएचएफएलच्या प्राधिकृत अधिकारींकडे सादर करण्यात यावा.

सुरक्षित मत्ता/ स्थावर मालमत्तेची विक्री याखाली दिलेल्या संक्षिप्त वर्णनानुसार ''जसे आहे जेथे ज्या स्थितीत आहे'' या तत्त्वावर करण्यात येणार आहे.

| अ. क्र. | लोन अका. नं. | ऋणको/ सह-ऋणको/ विधि वारसदार/ विधि प्रतिनिधी/ हमीदारांची नावे | मागणी सूचनेनुसार रक्कम | राखीव किंमत | इसारा रक्कम ठेव | ताब्याचा प्रकार |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | १००२१८४७ | श्री. किशोर दत्तात्रय इंगळे, श्री. मनोज दत्तात्रय इंगळे, श्रीमती झुंबरबाई दत्तात्रय इंगळे | रु. ११,०२,०६२/- २८.०१.२०२३ | रु. ९,००,०००/- (रुपये नऊ लाख फक्त) | रु. ९०,०००/- (रुपये नव्वद हजार फक्त) | प्रत्यक्ष |
| **स्थावर मालमत्तेचे वर्णन :** पुढील मालमत्तेचे सर्व खंड व तुकडे- एन. ए. सर्व्हे नं. ३/१/२ (जुना सर्व्हे नं. २), त्यापैकी प्लॉट नं. ०१ व ०२, त्यावरील फ्लॅट नं. ११, मोजमापाचा बिल्ट-अप एरिया ५८.०८ चौ.मी., तिसरा मजला, 'साई बालाजी-ए'मधील व येथे स्थित- सिन्नर, सिन्नर म्युनिसिपल काऊन्सिलच्या मर्यादित, जि. नाशिक. **पुढीलप्रमाणे सीमित : पूर्व-** 'बी' विंगचा फ्लॅट नं. १४, **पश्चिम-** 'ए' विंगचा फ्लॅट नं. १२, **उत्तर-** 'ए' विंगचा फ्लॅट नं. १०, **दक्षिण-** कॉलनी रोड. | | | | | | |
| २ | टीसीएचएच एल०६०१ ०००१०००८५ २६३ | श्री. सोनाराम सावारामजी देवासी, श्रीमती जमना सोनाराम देवासी | रु. २७,३८,८४८/- (रुपये सत्तावीस लाख अडतीस हजार आठशे अठ्ठेचाळीस फक्त) १५.११.२०२२ | रु. २५,५४,६००/- (रुपये पंचवीस लाख चौपन्न हजार सहाशे फक्त) | रु. २,५५,४६०/- (रुपये दोन लाख पंचावन्न हजार चारशे साठ फक्त) | प्रत्यक्ष |
| **स्थावर मालमत्तेचे वर्णन : अनुसूची-ए** पुढील मालमत्तेचे सर्व खंड व तुकडे- प्लॉट नं. ३३ मोजमापाचा २०४.७५ चौ.मी., बिगर-कृषी, निर्धारित कर रु. ११२.६१ पै., सर्व्हे नं. ८/३ यापैकी, येथे स्थित- व्हिलेज त्रिंबकेश्वर, ता. त्रिंबकेश्वर, जि. नाशिक, त्रिंबकेश्वर म्युनिसिपल काऊन्सिलच्या मर्यादित, ता. त्रिंबकेश्वर, जि. नाशिक. **अनुसूची-बी** 'गंगा रो हाऊस' नावाची बिल्डिंग पूर्वोक्त मालमत्तेवरील, उक्त बिल्डिंगमधील व त्यापैकी, रो हाऊसची प्रीमायसेस, धारण केलेला रो हाऊस नं. ०२, मोजमापाचे ७४.३५ चौ.मी., बिल्डिंग प्लानमध्ये दर्शविल्यानुसार, तळमजला + पहिला मजला यावरील बिल्ट-अप एरिया. उक्त प्रीमायसेस मंजूर केलेल्या बिल्डिंग प्लाननुसार सीमित आहे. पुढीलप्रमाणे सीमित : **पूर्व :** रो हाऊस नं. ३, **पश्चिम :** साइड मार्जिन, **उत्तर :** रो हाऊस नं. १, **दक्षिण :** साइड मार्जिन. | | | | | | |

लिलावाच्या स्थळी आम जनतेस त्यांच्या बोली व्यक्तिशः सादर करण्यास आमंत्रित करण्यात आले आहे. ऋणको/ सह-ऋणकोंना या सूचनेच्या प्रसिद्धीच्या तारखेपासून १५ दिवसांच्या आत पुढील व्याजासह एकूण देणींचे प्रदान करण्यास शेवटची संधी देण्यात येत आहे, त्यास असमर्थ ठरल्यास अनुसूचीनुसार स्थावर मालमत्तेची विक्री करण्यात येईल. जर प्राधिकृत अधिकारींकडे व्याज व किमतीसह (विक्रीचा खर्च समाविष्ट) पूर्वोक्त देय रकमेचा भरणा केल्यास किंवा सदर सुरक्षित ऋण, व्याज व खर्च लिलाव तारखेपूर्वी प्रदान केल्याचा पुरावा त्यांच्या समाधानाखातीर प्राधिकृत अधिकारींना दिला असल्यास ई-लिलाव थांबविण्यात येईल.

कोणताही अधिकारी किंवा कोणतीही व्यक्ती, या विक्रीसंबंधित बोलीकरिता प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे कोणतीही भूमिका बजावीत असल्यास विक्री, तथापि, विकलेल्या मालमत्तेवरील कोणतेही हित संपादन करणे किंवा करण्याचा प्रयत्न करणार नाही.

विक्री सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेन्ट) रुल्स २००२ यामधील विहित आणि पुढील शर्तींच्या अनुसरणाच्या विषयाधीन राहील :

**नोंद :** ई-लिलाव प्रत्येकी १० मिनिटांच्या मर्यादित विस्तारासह २८.०९.२०२४ रोजी दु. ०२.०० व दु. ०३.०० दरम्यान **http://bankauctions.in/** या पोर्टलद्वारा आयोजिला जाईल.

**शर्ती व अटी : १.** याखालील अनुसूचीतील विनिर्दिष्ट तपशील निम्नस्वाक्षरीकारांच्या उत्तम माहितीच्या आधारे दिलेला आहे; परंतु निम्नस्वाक्षरीकार या उद्घोषणेतील कोणतीही चूक, असत्यकथन किंवा लोपन याकरिता उत्तरदायी नसतील. बोली रक्कम किंवा बोलीदारासंबंधित कोणताही वाद उद्भवल्यास स्थावर मालमत्ता पुन्हा एकदा प्राधिकृत अधिकारींच्या स्वेच्छाधिकाराच्या विषयाधीन लिलावात ठेवण्यात येईल. **२.** स्थावर मालमत्तेची राखीव किमतीच्या खाली विक्री केली जाणार नाही. **३.** बोलीवृद्धी रक्कम रु.१०,०००/- (रुपये दहा हजार फक्त) असणार आहे. **४.** मालमत्तेच्या खरेदीकरिता सादर केलेल्या सर्व बोली टाटा कॅपिटल हाऊसिंग फायनान्स लि.च्या नावे, देय शाखेच्या पत्त्यावर, डिमाण्ड ड्राफ्टद्वारा वर नमूद केल्यानुसार इसारा रकमेसमवेत असतील. डिमाण्ड ड्राफ्ट्स लिलावानंतर अयशस्वी बोलीदारांना परत केले जातील. एनईएफटी/ आरटीजीएस/ आयएमपीएसद्वारा इरठेच्या प्रदानाकरिता, कृपया प्राधिकृत अधिकारींशी संपर्क साधावा. **५.** उच्चतर बोलीदारास यशस्वी बोलीदार म्हणून घोषित करण्यात येईल, मात्र असे की तो/ ती बोलीकरिता कायद्याने अर्हताप्राप्त असावा/ असावी आणि अधिक बोली रक्कम राखीव किमतीच्या कमी नसावी. उच्चतर बोलीची स्वीकृती किंवा नापसंती प्राधिकृत अधिकारींच्या स्वेच्छाधिकारावर राहील, जेव्हा दिलेली किंमत स्पष्टपणे त्यांना अपुरी वाटल्यास त्यांना तसे करणे भाग पडल्यास. **६.** अभिलिखित कारणे देऊन विक्री स्थगित करण्याचा/ खंडित करण्याचा स्वेच्छाधिकार प्राधिकृत अधिकारींचा राहील. **७.** स्थावर मालमत्तेची पाहणी १८.०९.२०२४ रोजी स. ११.०० व सायं. ०५.०० दरम्यान भेटीची पूर्ववेळ ठरवून करता येईल. **८.** यशस्वी बोलीदार म्हणून घोषित झालेली व्यक्ती, सदर घोषणेनंतर त्वरित, खरेदी रक्कम/ बोली रकमेच्या पंचवीस टक्के ठेव जमा करील, ज्यामध्ये २४ तासांच्या आत प्राधिकृत अधिकारींकडे जमा करावयाची इरठे रक्कम समाविष्ट असेल आणि सदर ठेव जमा करण्यास कसूर झाल्यास मालमत्ता पुढे खासगीरीत्या नवीन लिलाव/ विक्रीकरिता ठेवण्यात येईल. **९.** जर वरीलनुसार प्रारंभिक ठेव जमा केल्यास, देय खरेदी रकमेची उर्वरित रक्कम मालमत्तेच्या विक्रीच्या निश्चित तारखेपासून १५व्या दिवशी किंवा तत्पूर्वी, सदर दिवस वगळता किंवा १५वा दिवस रविवार किंवा अन्य सुट्टीचा दिवस असल्यास १५व्या दिवसानंतर येणाऱ्या पहिल्या कार्यालयीन दिवशी प्राधिकृत अधिकारींकडे खरेदीदाराद्वारा प्रदान करावयाची आहे. **१०.** वर नमूद केलेल्या कालावधीच्या आत कोणत्याही प्रदानास कसूर झाल्यास मालमत्ता खासगीरीत्या नवीन लिलाव/ विक्रीकरिता ठेवण्यात येईल. इरठेसमाविष्ट ठेव टाटा कॅपिटल हाऊसिंग फायनान्स लि.द्वारा जप्त करण्यात येईल आणि कसूर करणारा खरेदीदार मालमत्तेवरील सर्व दावे गमावेल. **११.** कोणत्याही भाराचा सविस्तर तपशील, टाटा कॅपिटल हाऊसिंग फायनान्स लि.ला ज्ञात असलेला, ज्याकरिता मालमत्ता पात्र आहे : वरील तालिकेनुसार. दावे, जर असल्यास, मालमत्तेकरिता पुढे ठेवण्यात आलेले आहेत आणि मालमत्तेचे स्वरूप व मूल्य यावरील धारण केलेला अन्य कोणताही ज्ञात तपशील : वरील तालिकेनुसार. स्वारस्य असलेल्या बोलीदारांना सल्ला देण्यात येतो की, त्यांनी मालमत्ता करावरील सांविधिक थकीत दायित्वे, विद्युत देय इ. समाविष्ट मालमत्तेवरील भारासंबंधित स्वतः स्वतंत्र चौकशी करावी. **१२.** कोणत्याही अन्य तपशिलाकरिता किंवा ई-लिलावावरील ऑनलाइन प्रशिक्षण प्रक्रिया याकरिता भावी बोलीदार सेवा-पुरवठाकार- मेसर्स ४क्लोजर, ब्लॉक नं. ६०५ए, ६वा मजला, मैत्रिवणम कमर्शियल कॉम्प्लेक्स, अमिरपेट, हैदराबाद-५०० ०३८ तिच्या समन्वयकाद्वारे- कर्नाटक व गोवा, मोबा. नं. ८१४२०००८०९, srinivas@bankauctions.in व तेलंगणा व एपी मोबा. नं.- ८१४२००००६४, prakash@bankauctions.in व ओरिसा, पश्चिम बंगाल, छत्तीसगढ, एनई राज्ये, मोबा. नं.- ८१४२०००३०, pradhan@bankauctions.in व तामिळनाडू व केरळ, मोबा. नं.- ८१४२०००७३५, dinesh@bankauctions.in व दिल्ली, एनसीआर, पंजाब, गुजरात, हरयाणा व उत्तर राज्ये, मोबा. नं. ९५१५१६००६४, prakash@bankauctions.in व महाराष्ट्र, गुजरात व मध्य प्रदेश, मोबा. नं.- ८१४२०००७२५, Arijit@bankauctions.in व ई-मेल : info@bankauctions.in किंवा मनिष बन्सल, ई-मेल आयडी : Manish.Bansal@tatacapital.com प्राधिकृत अधिकारी, मोबाइल नं. ८५८८९८३६९६ यावरून संपर्क साधू शकतील. कृपया तुमच्या शंका व्हॉट्सॲप नंबर ९९९९०७८६६९ यावर पाठवाव्यात. **१३.** घोषित बोली रकमेच्या उच्चतर बोलीवरील १%ची टीडीएस लागू असेल व देय असेल. रक्कम मालक/ ऋणकोच्या पॅनमध्ये उच्चतर बोलीदाराद्वारा भरणे आवश्यक आहे आणि चलनाची प्रत आमच्या कंपनीकडे सादर करण्यात यावी. **१४.** कृपया वरील तपशिलाकरिता **www.http://surl.li/mlxwvg** या सुरक्षित धनकोच्या **वेबसाइट**वर तरतूद केलेली लिंक पाहावी. **१५.** कृपया https://www.tatacapital.com/property-disposal.html या लिंकलासुद्धा भेट द्यावी.

**कृपया नोंद घ्यावी :** टीसीएचएफएलने या मालमत्तेच्या विक्री/ लिलावाकरिता नमूद केलेले ऑक्शनिंग पार्टनर वगळता कोणत्याही दलाल/ एजन्टची नियुक्ती केलेली नाही. स्वारस्य असलेल्या पक्षकारांनी या प्रकरणासंबंधित सर्व शंका व चौकशी याकरिता केवळ निम्नस्वाक्षरीकार किंवा प्राधिकृत अधिकारींशी संपर्क साधावा.

**स्वाक्षरी/-**
**प्राधिकृत अधिकारी**
**टाटा कॅपिटल हाऊसिंग फायनान्स लि.**

**स्थळ : नाशिक**
**दिनांक : १२.०९.२०२४**


## रोटरी क्लबतर्फे मालेगावात मोफत डायलिसिस सेवा

**लोकसत्ता वार्ताहर**

**मालेगाव :** येथील लाईफ केअर रुग्णालय आणि मानसी ट्रस्ट यांच्या सहकार्याने रोटरी क्लब ऑफ मालेगाव व्हिजन या संस्थेतर्फे मोफत डायलिसिस केंद्र सुरू करण्यात येत आहे. या केंद्राचा लोकार्पण सोहळा शुक्रवारी सकाळी ११ वाजता होत असल्याची माहिती प्रकल्प प्रमुख प्रसाद पेठकर यांनी पत्रकार परिषदेत दिली.

सामाजिक चळवळीत कार्यरत असणाऱ्या काही कार्यकर्त्यांनी एकत्र येत सहा महिन्यांपूर्वी रोटरी क्लब ऑफ मालेगाव व्हिजन या संस्थेची स्थापना केली. स्थापनेनंतर संस्थेतर्फे विविध सेवाभावी उपक्रम राबविण्यात येत आहेत. त्याचाच भाग म्हणून गरजू रुग्णांना दर्जेदार व मोफत आरोग्य सुविधा उपलब्ध करून देण्यावर संस्थेने भर दिला आहे. मालेगावात डायलिसिसची गरज असणाऱ्या रुग्णांची संख्या मोठी असली तरी स्थानिक पातळीवर सोय नसल्याने संबंधित रुग्ण व त्यांच्या नातेवाईकांची गैरसोय होत असते. शिवाय या उपचारावरील आर्थिक भार देखील अनेकांना पेलणे अशक्य होत असते. या रुग्णांना नाशिक किंवा धुळ्यासारख्या शहरांत डायलिसिस उपचारांसाठी धाव घ्यावी लागते. ही गैरसोय टाळण्यासाठी स्थानिक पातळीवर मोफत स्वरूपात ही सेवा उपलब्ध करून देण्याचा संकल्प संस्थेतर्फे करण्यात आला होता. त्यानुसार येथील लाईफ केअर रुग्णालयात ही सेवा सुरू करण्यात येत आहे. डायलिसिस केंद्रासाठी ३० लाखांची अत्याधुनिक यंत्रसामग्री खरेदी करण्यात आली आहे. तसेच डॉ. राहुल देशमुख आणि शिल्पा देशमुख यांनी केंद्रासाठी मोफत जागा उपलब्ध करून दिली आहे. संस्थेतर्फे राबविण्यात येणाऱ्या विविध सेवाभावी उपक्रमांसाठी येणारा आर्थिक भार सुमारे ७० सदस्यांच्या योगदानातून भागविला जात आहे.

नजीकच्या काळात हृदयरोग आणि कर्करोग रुग्णांच्या उपचारासाठी मालेगावात अत्याधुनिक रुग्णालय उभारण्याचा संस्थेचा मानस असल्याचेही पेठकर यांनी नमूद केले.

## जलप्रदूषण रोखणारा 'देव द्या, देवपण घ्या' उपक्रम स्तुत्य

### अभिनेता अभिजीत खांडकेकर यांचे मत

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**नाशिक :** गोदावरी नदीचे प्रदूषण रोखण्यासाठी १४ वर्षांपासून राबविण्यात येत असलेला ''देव द्या, देवपण घ्या'' हा उपक्रम स्तुत्य असून नाशिककरांनी या उपक्रमात मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन अभिनेता अभिजीत खांडकेकर यांनी केले आहे. उपक्रमांतर्गत नाशिककरांमध्ये जनजागृती करणाऱ्या माहितीपत्रकांचा प्रकाशन सोहळा अभिनेता अभिजीत खांडकेकर यांच्या हस्ते व राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष ॲड. रवींद्र पगार यांच्या अध्यक्षतेखाली झाला. यावेळी डॉ. राजेंद्र आभाळे हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

सुविचार मंच आणि विद्यार्थी कृती समिती यांच्या माध्यमातून युवकांची शक्ती विधायक कार्यात सहभागी असल्याबद्दल खांडकेकर यांनी समाधान व्यक्त केले. प्लास्टर ऑफ पॅरिसच्या मूर्ती, त्यावरील रासायनिक रंगांचे काम, यामुळे गोदावरी नदीचे प्रदूषण होते. जलप्रदूषण रोखण्यासाठी जनजागृती करणाऱ्या माहितीपत्रकांचे घराघरात वाटप करण्यात येणार आहे. देव द्या, देवपण घ्या उपक्रमाची युवकांकडून मोठ्या प्रमाणावर जनजागृती करण्यात येत असल्याचे उपक्रमाचे संयोजक आकाश पगारे यांनी सांगितले.

या माध्यमातून पाच दिवस व सात दिवसांच्या गणेशोत्सवातील मूर्तींचे संकलन देखील करण्यात येणार आहे. उपक्रमात सहभागी होण्यासाठी ९४२१५६३५५५ या क्रमांकावर संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

## गुन्हेगार शेराच्या तडीपारीचे आदेश

**मालेगाव :** शहराच्या इस्लामाबाद भागातील सराईत गुन्हेगार रहेमानी आदिल उर्फ आदिल शेरा (२२) यास येथील उपविभागीय दंडाधिकाऱ्यांनी एक वर्ष कालावधीसाठी मालेगावातून तडीपार करण्याचे आदेश दिले आहेत. शेराविरुद्ध शहरातील विविध पोलीस ठाण्यांमध्ये गंभीर स्वरूपाचे गुन्हे दाखल आहेत. जिल्हा पोलीस अधीक्षक विक्रम देशमाने यांनी या प्रस्तावास मान्यता दिल्यानंतर उपविभागीय दंडाधिकारी कार्यालयाकडे प्रस्ताव सादर करण्यात आला होता. उपविभागीय दंडाधिकारी नितीन सदगीर यांनी प्रस्ताव मान्य करून शेराला मालेगावातून एक वर्षासाठी तडीपार करण्याचे आदेश दिले आहेत.

## बिटको रुग्णालयात रुग्णाचा विनयभंग

**लोकसत्ता विशेष प्रतिनिधी**

गुन्हे वृत्त

**नाशिक :** नाशिकरोड येथील महानगरपालिकेच्या बिटको रुग्णालयात उपचार घेणाऱ्या महिला रुग्णाचा विनयभंग करून संशयिताने दाम्पत्यास मारहाण केली. नाशिकरोड परिसरातील आजारी महिला बिटको रुग्णालयात दाखल आहे. रात्री ती आपल्या कक्षात एकटी असतांना ही घटना घडली.

पलंगावर महिला झोपली असताना कक्षात शिरलेल्या व्यक्तीने त्यांच्याजवळ येऊन जेवण केले का, अशी विचारपूस केली. रुग्णालयातील कर्मचारी असेल असे समजून महिला त्याच्याशी बोलत असताना पलंगावर बसलेल्या संशयिताने तिचा विनयभंग केला. महिलेने आपल्या पतीला बोलावून घेत संशयिताला जाब विचारला असता त्याने दाम्पत्यास मारहाण करून पलायन केले. या प्रकरणी नाशिकरोड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

### टोळक्याच्या हल्ल्यात एक जण जखमी

टोळक्याने पानटपरीवरील कर्मचाऱ्यास मारहाण करुन त्याच्यावर कोयत्याने वार केल्याची घटना नाशिकरोड रेल्वे स्थानक भागात घडली. यात संबंधित कर्मचारी जखमी झाला आहे. याबाबत समाधान जमदडे (२२, विहितगाव) या युवकाने तक्रार दिली. पियुष जाधव, हुसेन शेख आणि त्यांचे दोन साथीदार अशी संशयितांची नावे आहेत. जमदडे रेल्वे स्थानक भागातील बादल वाघ यांच्या पान टपरीवरील कर्मचारी आहे. मंगळवारी रात्री तो काम करत असताना परिचित असलेले टोळके पान टपरीवर आले. संशयितांनी पानटपरी मालक बादल वाघ याच्याबाबत चौकशी केली. जमदडेने आपल्याला माहिती नसल्याचे सांगितल्याने ही घटना घडली. कुठलेही कारण नसतांना टोळक्यातील पियुष जाधवने कोयता काढून जमदडे याच्या डोक्यात मारला. जखमी अवस्थेत तो टपरीत बसला असता इतरांनी त्याला दुकानाबाहेर ओढून लाथाबुक्यांनी मारहाण केली. या घटनेत जमदडे गंभीर जखमी झाला. या प्रकरणी नाशिकरोड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

### दुकाने फोडून दोन लाखाचे साहित्य लंपास

पेठ रस्त्यावरील जुना जकात नाका भागात चोरट्यांनी रविवारी रात्री दोन दुकाने फोडून रोकडसह दुकानांमधील सुमारे दोन लाखाचे साहित्य लंपास केले. याबाबत राजेंद्र पिंगळे यांनी तक्रार दिली.

# नाशिक ढोलताशा महोत्सवात तरुणाईचा जल्लोष

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**नाशिक :** वैविध्यपूर्ण उपक्रमांची आखणी करणाऱ्या येथील ऊर्जा युवा प्रतिष्ठानच्या वतीने गणेशोत्सवा निमित्ताने आयोजित ''नाशिक ढोलताशा महोत्सव २०२४-जल्लोष तरुणाईचा'' स्पर्धेत वरदविनायक मंडळाने प्रथम क्रमांकाचे एक लाख रुपयांचे पारितोषिक मिळविले.

नाशिकचा डंका जगभर गाजविणाऱ्या 'नाशिक ढोलताशा' चा सन्मान करण्यासाठी ऊर्जा युवा प्रतिष्ठान आणि ढोल ताशा समिती नाशिक यांच्या संयुक्त विद्यमाने महोत्सवाचे आयोजन गंगापूर रस्त्यावरील रावसाहेब थोरात सभागृहात करण्यात आले होते. कोणतेही मंगल कार्य असो, उत्सव असो, की सणसमारंभ, महाराष्ट्रात ढोलताशा वाजला नाही तर तो उत्सव साजरा झाला, असे वाटतच नाही.

> ११ ढोलताशा पथकांनी या सादरीकरण केले .लयबद्ध ताल आणि ठेका या वैशिष्ट्यांची अनुभूती नाशिककरांना आली . शंख, झांज, टाळ आणि भलामोठा ढोल, असे चित्र होते .

आपल्या मांगल्याचे प्रतिक असणारे हे ढोलताशा वादन ऐकणाऱ्या प्रत्येकाला ठेका धरायला आणि पाय थिरकायला लावले नाही तर नवलच. हेच महत्त्व अधोरेखित करण्यासाठी ''नाशिक ढोलताशा महोत्सव २०२४ इ जल्लोष तरुणाईचा'' याचे आयोजन ऊर्जा युवा प्रतिष्ठानचे अध्यक्ष शिवसेना उपनेते, जिल्हाप्रमुख अजय बोरस्ते व ढोलताशा समिती नाशिकचे अध्यक्ष प्रीतम भामरे यांनी केले.

नाशिक शहर व जिल्ह्यातील नामवंत ११ ढोलताशा पथकांनी या महोत्सवात सादरीकरण केले. परीक्षक म्हणून पुण्यातील प्रशांत तांबे, अक्षय लकवडे, अभिजित कुमावत यांनी काम पाहिले. लयबद्ध ताल आणि ठेका या वैशिष्ट्यांची अनुभूती यावेळी नाशिककरांना आली. शंख, झांज, टाळ आणि भलामोठा ढोल, असे चित्र यावेळी दिसत होते.

महोत्सवाच्या उदघाटनप्रसंगी आयोजक अजय बोरस्ते यांच्यासह पालकमंत्री दादा भुसे, शिवसेना शिंदे गटाचे प्रवक्ते संजय शिरसाट, अभिनेते अभिजित खांडकेकर आदी उपस्थित होते. महोत्सवास सुरुवात झाल्यावर अभिनेते स्वप्नील जोशी, अभिनेत्री सुप्रिया पिळगावकर, हेमल इंगळे यांचीही उपस्थिती लाभली. कार्यक्रमास प्रेक्षकांचा उत्तम प्रतिसाद लाभला.




नाशिक येथे आयोजित ढोलताशा महोत्सवात प्रथम क्रमांक मिळविणाऱ्या वरदविनायक मंडळाच्या सदस्यांसह आयोजक ऊर्जा युवा प्रतिष्ठानचे प्रमुख अजय बोरस्ते आणि इतर

### ढोलताशा महोत्सव स्पर्धेचा निकाल

नाशिक ढोलताशा महोत्सवात वरदविनायक मंडळाने प्रथम, शिवसाम्राज्यने व्दितीय तर, शिवतांडवने तृतीय क्रमांक मिळविला. प्रथम क्रमांकासाठी एक लाख रुपये, व्दितीय क्रमांकासाठी ५१ हजार आणि तृतीय क्रमांकासाठी ३१ हजार रुपये अशी पारितोषिके देण्यात आली. उत्कृष्ट ढोलवादक म्हणून साक्षी सावळे (मल्हार गजर), ताशावादक प्रेम राठोड (वरदविनायक), टोलवादक भावना पाचपुते (माऊली) आणि ध्वजधारी म्हणून शिवम साबळे (स्वंयभू) यांना गौरविण्यात आले.